सहदिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर बीड यांच्या दि. ०५.०२.२०१५ च्या आदेशानुसार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया असफल झाल्याच्या कारणास्तव श्रीमती लतिफा बेगम शेख इब्राहिम यांना दयावयाच्या नुकसान भरपाई बाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः कुनिश -२०१८/प्र.क्र.२०८/कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि.मार्ग, मुंबई ४०० ००१
तारीख: २८ मार्च,२०१९

वाचा -

१) सह दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर बीड यांच्या नियमित सिव्हील सुट क्रमांकः ३३८/२०१२ च्या संदर्भात दि.०५.०२.२०१५ चे आदेश
२) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या जा. क्रमांकः राआअ/कक्ष/न्या. प्रकरण/श्रीम. लतिका बेगम इब्राहिम/अनु.मागणी प्रस्ताव/ १२०-२४/ १८,दि.२२.०२.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना -

श्रीमती लतिफा बेगम शेख इब्राहिम ही बालेपीर, बीड, ता.जि.बीड यांनी जिल्हा रुग्णालय, बीड येथे दि.१५.०२.२००५ रोजी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेतली होती. सदर शस्त्रक्रिया असफल होवुन पुनश्च गर्भधारणा झाल्यामुळे त्यांनी शासना विरुध्द नुकसान भरपाईचा दावा मा. सह दिवाणी न्यायलय , वरिष्ठस्तर, बीड येथे केला होता. सदर प्रकरणात मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, बीड यांनी निकाल देवून संबंधितांस रु. ७५,०००/- व त्यावरील ६ टक्के दराने व्याजासह देण्याबाबत दि.०५.०२.२०१५ रोजी आदेशित केले होते. सदर प्रकरणी संबंधितांस दावा दाखल केल्यापासून म्हणजे दि.१३.०७.२०११ ते दि. १३.११.२०१७ या कालावधीचे व्याज रु. २८,५००/- , दाव्याचा खर्च रु.१२,५००/- असे एकूण रु.१,१६,०००/- नुकसान भरपाई देण्याचे जिल्हा सरकारी अभियोक्ता बीड यांनी कळविले आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. २ अन्वये आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. याबाबत शासन पुढील प्रमाणे मंजुरी देत आहे.

शासन निर्णय -

नियमित सिव्हील सुट क्र. ३३८/२०१२ संदर्भात सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर बीड, यांच्या दि.०५.०२.२०१५ च्या आदेशाच्या अनुषंगाने श्रीमती लतिफा बेगम शेख इब्राहिम यांच्यावरील कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया असफल झाल्याने त्यांना नुकसान भरपाई पोटी रु. १, १६,०००/- (रुपये एक लक्ष सोळा हजार फक्त) एवढी रक्कम देण्यासाठी या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, बीड हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. आर - १, २२११ कुटुंब कल्याण, १०५ नुकसान भरपाई (०१) नुकसान भरपाई पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेसाठी प्रोत्साहनात्मक रक्कम (२२११ ०५९७) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदरचा आर्थिक लाभ थेट लाभार्थीच्या आधारलिंक बॅक खात्यात जमा करण्यात येईल याची दक्षता आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी व सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करुन त्याची एक प्रत मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, बीड यांना सादर करावी.

४. हा शासन निर्णय वित्तीय नियम अधिकार पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-२, अ.क्र.२, नियम क्रमांक ७ अन्वये प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१२१८४०६४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.03.29 11:31:07 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

३. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बीड
५. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड .
७. अवर सचिव (अर्थसंकल्प) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. लतिफा बेगम शेख इब्राहिम, रा.बालेपीर, सहारा हॉटेल समोर, नगररोड, बीड, ता.जि.बीड
९. निवडनस्ती.